# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४/ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**Tel:** (0253) 2539219 **EPABX:** 0253-2539100-300
**E-mail:** coe@muhs.ac.in / **Website:** www.muhs.ac.in

MUHS

**डॉ. अजित गजानन पाठक**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**परीक्षा नियंत्रक**

**Dr. Ajit Gajanan Pathak**
M.B.B.S., M.D. (Forensic Medicine)
**Controller of Examinations**


जा.क्र. मआविवि/एक्स-सी/३२५८/२०२०

दिनांक : २३/०६/२०२०

## परिपत्रक

**प्रति,**
**मा.अधिष्ठाता / प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था,
म.आ.वि.वि., नाशिक

**विषय:** **उन्हाळी-२०२० परीक्षेच्या अनुषंगाने परीक्षार्थींसाठी सूचना...**

**संदर्भ:**
**१. शासनाच्या धोरणास अनुसरुन व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांच्या अधिन राहून**
**२. विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/एक्सपी/९६/२९८३/२०२० दिनांक ०५/०६/२०२०**
**३. विद्यापीठ परिपत्रक क्र.मआविवि/एक्स-सी/२९८६/२०२० दिनांक ०६/०६/२०२०**

महोदय/ महोदया,

मला प्राप्त आदेशानुसार, आपणास सुचित करण्यात येते की, कोव्हिड-१९ आजाराचा प्रार्दुभाव व टाळेबंदच्या सध्याच्या परिस्थितीच्या अनुषंगाने परीक्षार्थींना विद्यापीठाद्वारे खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

**परीक्षार्थींना सुचना :-**

१. दिनांक ०५/०६/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यापीठाने दि. १६/०७/२०२० पासून सुरु होणाऱ्या अंतिम वर्ष अभ्यासक्रमाच्यां पदवीपुर्व विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षेचे तात्पुरत्या स्वरुपाचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केले होते. परंतु, सदरील वेळापत्रक हे तात्पुरत्या स्वरुपाचे असून, त्या-त्या वेळेच्या कोव्हिडच्या परिस्थितीवर व वेळोवेळी शासनाच्या निर्गमित होणाऱ्या आदेशानुसारच निश्चित होणार असल्यामुळे, अंतिम निश्चित वेळापत्रक हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्याशिवाय, विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी, त्यांचे सध्याचे वास्तव्याचे ठिकाण सोडू नये असे या परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येत आहे.
२. परीक्षार्थी विद्यार्थी / विद्यार्थीनींनी अनावश्यक प्रवास टाळून आपल्या सध्याच्या सोयीच्या वास्तव्याच्या ठिकाणीच शांतपणे परीक्षेची तयारी करावी.
३. विद्यार्थ्यांनी यासंदर्भात महाविद्यालयाच्या संपर्कात रहावे (दुरध्वनी / ई-मेल / एस.एम.एस. इत्यादी). परीक्षे संदर्भात सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी इतर माध्यमातून येणाऱ्या सूचना व बातम्यांवर विश्वास ठेवू नये.

करीता, सदरील परिपत्रकास ठळक प्रसिध्दी देण्यात यावी व महाविद्यालयाने सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

Maharashtra University of Health Sciences
MUHS
Nashik

अजित पाठक

(डॉ. अजित ग. पाठक)
**परीक्षा नियंत्रक**